International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# पर्यटनातील आधुनिक कल : एक अभ्यास

**श्रीमती अफसाना हमीद शेख**
*श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.*
*Corresponding Author - श्रीमती अफसाना हमीद शेख*
**DOI - 10.5281/zenodo.10951977**

**गोषवारा:**

*एकविसाव्या शतकात पर्यटन हा व्यवसाय सर्वात जलद गतीने विकसित होत आहे. यामध्ये कमी भांडवल गुंतवणूक व जास्त फायदा असल्याने विकसित व अविकसित देश यांचा सहभाग दिवसेंदिवस यामध्ये वाढत आहे. पर्यटन हा व्यवसाय ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक घटकांच्या आधारावर चालतो. या बाबींमध्ये जितकी जास्त विविधता तितका या व्यवसायाचा विकास जास्त होतो. भौगोलिक पर्यटनामध्ये पठार, पर्वत, मैदान, नद्या, दरी, धबधबे असा विविध प्राकृतिक घटकांचा समावेश होतो. तसेच मानवी घटकांमध्ये लोकसंख्या, समाज, संस्कृती, शेती व आर्थिक प्रगती यांचा समावेश होतो. पर्यटन ही आधुनिक काळातील एक मोठी प्रमुख आर्थिक क्रिया आहे. पर्यटन उद्योग हा भारतातील अत्यंत वेगाने वाढ होणारा एक उद्योग आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे प्रदेशातील साधन संपत्ती तसेच सोयींची गुणवत्ता सुधारते. कोणत्याही प्रदेशातील पर्यटन व्यवसायाचा विकास हा मुख्यत्वे वाहतूक सेवा, निवासी सेवा, मनोरंजन, बाजारपेठा इत्यादी घटकांवर अवलंबून असतो. पर्यटकांचे राष्ट्रीयत्व, पर्यटनाचा कालावधी, पर्यटकांची संख्या, पर्यटनाचा उद्देश, पर्यटकांनी वापरलेले वाहतूक साधने, ऋतू, पर्यटनाचे स्वरूप यासारख्या विविध आधारांवर पर्यटनाचे वर्गीकरण केले जाते. सध्या पर्यटन व्यवसाय हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योग बनला आहे. अलीकडच्या काळात पर्यटन क्षेत्रात काही नवीन कल दिसून येऊ लागले आहेत. हे कल या क्षेत्रातील प्रस्थापित कलांना पूरक असेच आहेत. पर्यटकांच्या आवडीनिवडी बदलत चालल्या आहेत. त्यामुळे पर्यटनाचे कल देखील बदलत चालले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पर्यटनाची संकल्पना व आधुनिक काळातील पर्यटनातील कल अभ्यासले जाणार आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोताचा वापर केला जाणार आहे.*

---

**प्रस्तावना :**

अलीकडच्या काही दशकात पर्यटन व्यवसायाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे आर्थिक विकास साधणारा व्यवसाय म्हणून हा जागतिक उद्योग बनला आहे. जगातील चौथ्या क्रमांकाचा महत्त्वाचा व्यवसाय म्हणून पर्यटनाकडे पाहिले जात आहे. भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने हा राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ

करणारा आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा व्यवसाय ठरला आहे. आज पर्यटन हा देशातील सर्वात वेगाने वाढवणारा सेवाभावी व्यवसाय असून संभाव्य पर्यटन विकासासाठी भारतात त्याला फारच पोषक वातावरण आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पर्यटन व्यवसायाकडे पाहिजे तितके लक्ष दिले गेले नाही मात्र भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने देशातील पर्यटनाचा टप्प्याटप्प्याने विकास होत गेला. आज देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे स्थान महत्त्वपूर्ण बनले आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या एकूण ७% उत्पन्न तर ९% लोकांना आज पर्यटन व्यवसायातून रोजगार उपलब्ध झाला आहे. भारतात असणारी प्रचंड विविधता, अनेक प्रकारची प्राकृतिक आकर्षाने, दाट असणारी जंगले, जंगलाच्या आश्रयाने राहणारे वन्य पशुपक्षी, मोठ्या प्रमाणावर असणारी ऐतिहासिक स्थळे, कला, साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकला इत्यादींचा झालेला विकास, अनेक धर्मियांची जागतिक पातळीवरील धार्मिक स्थळे इत्यादी सर्व गोष्टींच्या उपलब्धतेमुळे भारत जगातील पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरला आहे. त्याचाच परिणाम म्हणून भारतात आज पर्यटन व्यवसायाचा झपाट्याने विकास होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशात पर्यटन हे रोजगार निर्मितीचे तसेच आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे महत्त्वपूर्ण स्त्रोत ठरले आहे. अलीकडे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार चालू दशकात भारताने पर्यटन क्षेत्रात एकूण जीडीपीच्या ९.२% पर्यंत योगदान दिले आहे. भारताच्या वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता शेतीपाठोपाठ पर्यटन क्षेत्रात आहे. याबाबत दुमत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण जगभरात जलद गतीने विकसित होणाऱ्या या पर्यटन उद्योगात भारताचा पाचवा क्रमांक लागला आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. अलीकडच्या काळात पर्यटन क्षेत्रात काही नवीन कल दिसून येऊ लागले आहेत. हे कल या क्षेत्रातील प्रस्थापित कलांना पूरक असेच आहेत. हे कल पर्यटन उद्योगाच्या क्षितिजाचा विस्तार करीत आहेत आणि महसूल निर्मितीसाठी नवीन मार्ग निर्माण करीत आहेत.

प्रवास हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. प्राचीन काळापासून मानवी विविध कारणांकरिता प्रवास करत आहे. नवीन व चमत्कारिक ठिकाणांचा शोध, अज्ञात स्थळांचा शोध, पवित्र धार्मिक स्थळांना भेट, निसर्गातील बदल अनुभवणे, क्शिक्षण व व्यापार इत्यादींचा यामध्ये समावेश होतो. प्राचीन ते आधुनिक कालखंडात पर्यटनास एक व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. नागरीकरण, औद्योगिकीरण, शिक्षण प्रसार, व्यापार व इतर उद्योगधंद्यांच्या विकासामुळे पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. पर्यटनाची संकल्पना अभ्यासणे.

२. आधुनिक काळातील पर्यटनाचा कल अभ्यासणे.

**तथ्य संकलन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोताचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट वरील माहिती इत्यादीचा आधार घेतला आहे.

**पर्यटनाची संकल्पना:**

पर्यटन हा शब्द लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून आला आहे. Tornus या शब्दाचा अर्थ प्रवास किंवा भटकंती करण्याचा होतो. टूर म्हणजे प्रवास त्यापासून Tourism म्हणजेच प्रवासासाठी बाहेर पडणे असा अर्थ होतो. 'पर्यटन' हा आधुनिक काळातील शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे अथवा पर्यटन म्हणजे माणसाने त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतरत्र केलेले अल्पकालीन स्थलांतर होय.

**पर्यटनाची व्याख्या:**

**हरमन शुलर्ड** या ऑस्ट्रेलियन अर्थतज्ञाच्या मते, 'परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात व शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजे पर्यटन होय.'

**प्रा. हुंझीकर व प्रा. कार्प** यांच्या मते, 'कायमस्वरूपी वास्तव्य न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.'

**जागतिक पर्यटन संघटना** 'एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी सलग एक वर्षापेक्षा अधिक काळ न राहता आराम, उद्योग किंवा इतर कामासाठी भ्रमंती किंवा प्रवास करतो त्या सर्वांचा समावेश पर्यटनात होतो.'

थोडक्यात, आपणास परिचित नसलेल्या प्रदेशात भ्रमंती करणाऱ्या अपरिचित व्यक्तीसंबंधी तेथील अपूर्व घटनांचा समावेश होतो. पर्यटन ही एक आनंददायी घटना आहे की, ज्यामध्ये मनुष्य प्रवास, भेटी दिलेली निरनिराळी ठिकाणे, भोजन, निवास इत्यादीवर स्वतः कमावलेले पैसे खर्च करतो.

**भारतातील पर्यटन:**

पर्यटन भारताच्या विकासाकरिता मोलाचा वाटा देणारा व्यवसाय म्हणून विचार केला जात आहे. उद्योगांना चालना, बेरोजगारांना रोजगार तसेच आर्थिक व सामाजिक विकास घडून येण्यासाठी पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील पर्यटन गेल्या दशकात २५ ते ३० टक्क्यांनी वाढले आहे आणि त्यामुळे मिळणाऱ्या परकीय चलनात ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**भारतात सन २०११ ते २०१८ या कालावधीत आलेले विदेशी पर्यटक व विदेशी मुद्रा**

| वर्ष | विदेशी पर्यटक (संख्या कोटी) | विदेशी मुद्रा (कोटी रु.) |
|---|---|---|
| २०११ | ६.३१ | ७७,५९१ |
| २०१२ | ६.५८ | ९४,४८७ |
| २०१३ | ६.९७ | १,०७,६७१ |
| २०१४ | ७.६८ | १,२३,३२० |
| २०१५ | ८.०३ | १,३५,१९३ |
| २०१६ | ८.८० | १,५४,१४६ |
| २०१७ | १०.०४ | १,७७,८७४ |
| २०१८ | १०.५६ | १,९४,८८२ |

**स्रोत - वार्षिक अहवाल २०१८-१९, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार.**

वरील तक्त्यावरून सन २०११ ते २०१८ या कालावधीत भारतात आलेल्या पर्यटकांच्या संख्येत व भारताला मिळालेल्या विदेशी मुद्रेमध्ये मोठ्या प्रमाणात दरवर्षी वाढ होताना दिसून येत आहे.

**पर्यटनातील आधुनिक कल :**

जगातील अर्थव्यवस्थेतील एक प्रमुख क्षेत्र म्हणून पर्यटन क्षेत्र उदयास आलेले आहे. जगातील सर्वात मोठा व वेगवान सेवा उद्योग, जागतिक अर्थव्यवस्थेवर क्रांतिकारी व मूलगामी स्वरूपाचा प्रभाव टाकणारा उद्योग अशा विविध दृष्टिकोनातून याची ओळख निर्माण झाली आहे. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशांमध्ये या उद्योगाला मोठा वाव आहे. आर्थिक संतुलन साधण्यास पर्यटन उद्योग हातभार लावत आहे. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता या उद्योगांमध्ये आहे. परकीय चलन प्राप्त करण्याचे एक प्रभावी माध्यम, पर्यावरण संरक्षण, ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धनाचे माध्यम आणि संस्कृतीचे पुनरुज्जीवन घडवून आणण्याची मोठी क्षमता या उद्योगांमध्ये आहे. कमीत कमी भांडवल गुंतवणूक असलेला उद्योग, रोजगार व गुंतवणुकीस उत्तेजन देणारा, विपणन व जाहिरात क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटक आहे. संपूर्ण जगभरात सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक महत्त्व प्राप्त झालेला एक उद्योग अशी ओळख या क्षेत्राची निर्माण झाली आहे. भारतामध्ये विविध ठिकाणी विविध वातावरणात व ऋतूमध्ये पर्यटनाच्या खूप संधी आहेत. सद्यस्थितीत पर्यटन व्यवसायाचे स्वरूप, आयाम व कल बदलत असून देश-विदेशातील पर्यटकांचा ओढा भारताकडे वाढलेला दिसून येत आहे. भारतामध्ये पर्यटन क्षेत्रात भविष्यात खूप मोठा वाघ अपेक्षित असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊ शकते. पर्यटन क्षेत्रातील काही महत्त्वाचे आधुनिक कल पुढील प्रमाणे:-

छोट्या सुट्टीतील पर्यटन

एकल पर्यटन

कृषी पर्यटन

पर्यावरण पूरक पर्यटन

वारसा पर्यटन

साहस पर्यटन

**छोट्या सुट्टीतील पर्यटन:**

आधुनिक काळातील पर्यटकांच्या मोठ्या वर्गामध्ये या संकल्पनेची लोकप्रियता वाढत आहे. लोक कमी खर्चासह छोट्या सहलीसाठी नवनवीन ठिकाणी शोधत आहेत. संसाधने व दळणवळण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे प्रवास करणे सोपे झाले आहे. आजचे प्रवास २०० ते ३०० किलोमीटरच्या परीघा मधील पर्यटन केंद्र शोधत आहेत आणि दोन ते तीन दिवसांच्या कालावधीत लहान सुट्ट्यांचे नियोजन करीत आहेत. विस्तारित सुट्टीच्या दिवशी म्हणजे शनिवार व रविवार सह पर्यटक कमीत कमी लहान सुट्ट्यांसाठी जवळील पर्यटन स्थळांकडे जाण्यासाठी उत्स्फूर्त योजना आखत आहेत. अशा लहान सुट्ट्यातील पर्यटनामुळे स्वतःला नवजीवन देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत आहे. मोठमोठे उद्योग समूह बऱ्याचदा कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी अशाच ब्रेकची योजना आखत आहेत. आर्थिक व्यवहार्यता व मिळणाऱ्या सोयी सुविधा यामुळे आठवड्याच्या शेवटी पर्यटनासाठी जाणे जास्त लोकप्रिय होत आहे.

**एकल पर्यटन:**

आधुनिक काळातील अतिरिक्त ताणतणाव व त्याची पुनरावृत्ती मानवा पुढे आव्हान निर्माण करीत आहे. त्यामुळे पर्यटक अनेकदा एकटेच प्रवासासाठी निघतात. अशा पर्यटनातून ते स्वतःचे आणि त्यांच्या जीवनातील उद्दिष्टांचे पुनरुत्थान करतात. असे पर्यटन हे केवळ नवीन ठिकाणांना भेट देण्यासाठी नसते तर स्वतःच्या आत्म्याशी पुर्नसंपर्क प्रस्थापित करण्यासाठी व जीवनाचे लक्ष शोधण्यासाठीचा मार्ग म्हणून या पर्यटनाकडे पाहिले जाते. या पर्यटनामध्ये एकटेच पर्यटन करणारे प्रवासी नवीन लोकांना भेटतात, नवीन ठिकाणांचा शोध घेतात, भीतीवर मात करतात व स्वतःला शोधून स्वातंत्र्याचा सर्वाधिक उल्लेखनीय आनंद घेतात. एकल प्रवासी कुठेही जाऊ शकतात व ते विस्मयकारकपणे आपल्या मार्गाची निवड करतात. भारतातील उत्तर पश्चिम हिमालयातील श्रीनगर-लेह रस्ता, केरळ मधील आलेप्पी, तमिळनाडूमधील कोडाईकॅनाॅल ही ठिकाणे एकल पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे.

**कृषी पर्यटन:**

कृषी पर्यटनामध्ये शेती व पर्यटन ही दोन मुख्य क्षेत्रे एकत्र आणली जातात. पर्यटन क्षेत्रामध्ये विस्तारण्याची क्षमता आहे तर कृषी क्षेत्रामध्ये सामावून घेण्याची क्षमता आहे. त्यामुळे कृषी क्षेत्र व पर्यटन क्षेत्र या दोन्ही क्षेत्रांचा फायदा होत आहे. कृषी पर्यटन म्हणजे शेतात पर्यटकांसाठी निवास, भोजन, शेतातील कामात सहभाग, शेती व शेतीपूरक व्यवसायांचे ज्ञान यांची संधी उपलब्ध करून देणे होय. कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांच्या राहण्याची सोय शेतकऱ्यांच्या घरांमध्ये किंवा त्यासारख्या सोयी बांधून उपलब्ध करून दिल्या जातात. येथील वातावरण हे ग्रामीण भागातील जीवनाचा आनंद देणारे असते. आजच्या

धकाधकीच्या जीवनातून थोडी विश्रांती व निवांत क्षण मिळावेत, यासाठी लोक शांत, निसर्गरम्य व प्रदूषण विरहित अशा दुर्गम भागातील कृषी पर्यटन केंद्रास भेट देण्यासही तयार असतात.

**पर्यावरण पूरक पर्यटन:**

भारताची ओळख नैसर्गिक सौंदर्याची खान अशी आहे. मॅक्स मुल्लरने एक विधान केले होते की, "जर निसर्ग देऊ शकत असेल अशा सामर्थ्य, समृद्धी आणि सौंदर्य लाभले आहे याची प्रचिती आणून देणारा देश शोधण्यासाठी जर जगभर बघितले तर मी भारताकडे बोट दाखवीन." मॅक्स मुल्लरचे हे विधान तंतोतंत खरे आहे. कारण निसर्गाची पूजा आणि नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण हा प्राचीन भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण जेव्हा पर्यावरण पर्यटनाकडे पाहतो तेव्हा भारतातील संपन्न आणि समृद्ध निसर्गाची आपणास प्रचिती येते. अनियंत्रित व अनिर्बंध पर्यटन वाढीमुळे पर्यटन स्थळाचे ठिकाणावरील नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊन त्याचा पर्यटनाच्या विकासावर वाईट परिणाम होतो. पर्यटनाचा पर्यावरणावरील दुष्परिणाम टाळून त्याचे संवर्धन करण्यासाठी तसेच स्थानिक लोकांच्या विकासासाठी पर्यटनाचा उपयोग व्हावा. यासाठी अलीकडच्या काळात पर्यावरण पूरक पर्यटनाची सुरुवात झाली आहे. पर्यटन स्थळावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांना हानी न पोहोचवता पर्यटकांना पर्यटनाचा आनंद दिला जातो. या प्रक्रियेमध्ये स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाते. या प्रकारच्या पर्यटनामुळे पर्यटकांना पर्यटनाचा आनंद देण्याबरोबरच नैसर्गिक व सांस्कृतिक साधन संपत्तीचे संवर्धन होते. पर्यटनाचा विकास करताना प्रदूषण निर्माण करणाऱ्या गोष्टींवर प्रतिबंध घातले जातात व उपलब्ध नैसर्गिक व स्थानिक सुविधांच्या आधारे पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**वारसा पर्यटन:**

भूतकाळातील व वर्तमान काळातील महत्त्वाच्या घटना व व्यक्तींची संबंधित असणारी ठिकाणे, इमारती, कलाकृती इत्यादींचा अनुभव घेण्यासाठी केलेल्या पर्यटनास वारसा पर्यटन असे म्हणतात. वारसा पर्यटनात सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक अशा सर्व घटकांचा समावेश होतो. राजवाडे, किल्ले, स्वातंत्र्य व सामाजिक चळवळीशी संबंधित वास्तू, स्मारके इत्यादींचे वारसा स्थळ म्हणून जतन केले जाते. अशा स्थळांना पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात, त्यामुळे वारसा पर्यटन हा एक वाढणारा उद्योग आहे. वारसा पर्यटक पर्यटन स्थळी दीर्घकाळ राहतात व इतर प्रवाशांच्या तुलनेत अधिक पैसा खर्च करतात. वारसा स्थळांबद्दल त्यांच्या मनात आदर असतो, त्यामुळे अशा पर्यटकांमुळे वारसा संसाधनांवर नकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता तुलनेने कमी असते.

**वैद्यकीय पर्यटन:**

वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या देशातून दुसऱ्या देशात जाणे होय. केवळ वैद्यकीय उपचार घेण्यात जाणे असा मर्यादित अर्थ अथवा संकल्पना वैद्यकीय पर्यटनात नाही तर उपचारादरम्यान तिथल्या आनंददायी वास्तव्याचा पैलू जोडला गेलेला आहे. आधुनिक उपचार घेण्यासाठी भारतातील रुग्ण युरोपीय देशांमध्ये जात होते. मात्र गेल्या एक दोन दशकात ही परिस्थिती बदललेली असून वैद्यकीय पर्यटनाला भारतात आयुर्वेद योगशास्त्राची भक्कम साथ लाभल्याने या पर्यटनाला चालना मिळत आहे. अनेक अविकसित व गरीब देशांच्या मध्ये असाध्य रोगावर उपचार होऊ शकत नाही व अथवा भीषण अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या रुग्णांवर अवघड शस्त्रक्रिया व अनुरूप उपचार होऊ शकत नाही किंवा गंभीर रोगांच्या साथीला तोंड द्यायला स्थानिक यंत्रणा सक्षम नसतात. अशा रुग्णांना उपचार योग्य उपचारासाठी दुसऱ्या राज्यात अथवा देशांमध्ये घेऊन जातात. एकविसाव्या शतकामध्ये पर्यटनाची संकल्पना बदलली आहे. पारंपरिक पर्यटनाबरोबर गेल्या काही गोष्टीपासून समाजातील सर्वच स्तरावर आरोग्यविषयक जागृती मोठ्या प्रमाणावर होत आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक शोध लागल्याने विशेषतज्ञांची संख्या वाढली आहे. सामाजिक जागृती बरोबरच वैद्यकीय क्षेत्रामध्ये पायाभूत सेवा सुविधांच्या दर्जामध्ये वाढ झाली आहे. विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी वैद्यकीय पर्यटन मोठ्या प्रमाणात केले जात आहे.

**साहस पर्यटन:**

साहस पर्यटनामध्ये नैसर्गिक ठिकाणी साहसी खेळ खेळणे व निर्जन तसेच अनोळखी भागाचा शोध घेण्यासाठी अशा भागात प्रवास करणे यांचा मुख्यत्वे समावेश होतो. तरुणांमध्ये साहसी पर्यटन वेगाने लोकप्रिय ठरत आहे. निसर्गाच्या सानिध्यात पदभ्रमंती करणे व विविध साहसी खेळ किंवा धाडसी अनुभव घेणे याकडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे. जगभर बंजी जंपिंग, पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, स्किइंग, जंगल भ्रमंती रिव्हर राफ्टींग, कयाकिंग, व्हॅली क्रॉसिंग, रॉक क्लाइंबिंग, गिर्यारोहण, ट्रेकिंग, सायकलिंग व बाईकिंग, व्हाईट वॉटर राफ्टिंग, स्कुबा डायव्हिंग, स्नार्केलिंग, स्काय डायव्हिंग, व्हॅली क्रॉसिंग, कॅवइंग, बॅक पॅकिंग, कॅम्पिंग यासारख्या धाडसी किंवा साहसी प्रकारांची मागणी वाढली आहे. सर्वच राष्ट्रांमध्ये साहसी पर्यटनाच्या सुरक्षितता आणि गुणवत्तेसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. भारतीय पर्यटन मंत्रालयानेही साहसी पर्यटन चालकांच्या मंजुरीसाठी दिशा निर्देश दिले आहेत. तसेच साहसी पर्यटनाच्या सुरक्षितता व गुणवत्तेच्या मानकांसाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. साहसी पर्यटनाच्या ठिकाणांसह पर्यटनाच्या पायाभूत सुविधा विकासासाठी वित्तीय सहाय्य देण्यात येत आहे. भारतात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किलिंग अँड माउंटीनेयर, गुलयर्ग, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्ट्स, गोवा, भारतीय पर्वतारोहण फेडरेशन, डव्हआन्स ऑपरेटर असोसिएशन ऑफ इंडिया यासारख्या संस्था साहसी

पर्यटनासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याचे काम करीत आहेत.

**निष्कर्ष:**

१. आधुनिक काळामध्ये पर्यटनाचा कल बदलत चालला आहे

२. पर्यटकांच्या आवडीनिवडी बदलत चालल्या आहेत. त्यामुळे पर्यटन क्षेत्र विस्तारत चालले आहे

३. पर्यटनामुळे आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

**शिफारशी:**

भारतात पर्यटन व्यवसायाच्या विकासाला चालना देण्यासाठी अजूनही काही गोष्टींची गरज आहे. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, चांगली व आरामदायी वेगवान वाहतूक व्यवस्था, गुप्त असणाऱ्या पर्यटन स्थळांचा शोध आणि विकास, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रभावीपणे केली जाणारी जाहिरात, राजकीय व सामाजिक दृष्ट्या देशात शांतता व सुव्यवस्था इत्यादींची आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. १. बागडे, प्रज्ञा 'भारतातील पर्यटन उद्योग: एक आर्थिक अभ्यास', Review of Research ISSN:2249-894X IMPACT FACTOR: 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 VOLUME- 8 ISSUE- 9 JUNE- 2019.

२. नागतोंडे, पी.एम., पारधी दिगंबर 'पर्यटन भूगोल', विद्या प्रकाशन, नागपूर.

३. भोसले, यशोधरा(२००५) 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४. सांगळे, शैलजा (२०१५)'पर्यटन भूगोल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५. लोकसत्ता - १३ मे २०१५

६. योजना - मे - २०१५

७. लोकराज्य - ऑक्टोबर- २०१५

८. www.tourism.in